# येशूने बहात्तर सुवार्तिकांना कामगिरीवर पाठवले

## इतर ठिकाणी जाऊन लोकांना शिष्य करण्याचे महत्व मुलांना शिकवा



**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, येशू पातकांची क्षमा करुन जीवनात आनंद आणतो, हे अद्याप माहित नसणाया लोकांकडे सुवार्ता घेऊन जाण्यास आमचे साहाय्य कर.''

मुलांचे वय आणि गरजा ह्यांना अनुरूप असे शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

देवाच्या राज्याची घोषणा करण्याकरीता येशूने आपल्या बहात्तर शिष्यांना कसे पाठवले ते **लूक 10:1-20** मध्ये वाचा. जगातील सर्व राष्ट्रांमध्ये सुवार्ता पोचावी आणि येशूचे कार्य पुढे सुरू राहावे यासाठी येशुने त्यांना लहान-लहान गटांमध्ये कशा प्रकारे शिक्षण दिले ते यावरून पहायला मिळते.

**शिक्षकांनी किंवा मोठया मुलाने लूक 10:1-20 मधून कथावृत्तांत्त सांगावा.**

पुढील प्रश्न विचारा *(प्रत्येक प्रश्नाच्या पुढे उत्तरादाखल वचनांचे क्रमांक दिलेले आहेत.)*

- प्रत्येक गटामध्ये किती सेवक होते? *(वचन 1. त्याने दोघा दोघांना पाठवले.)*
- त्यांनी प्रथम कशासाठी प्रार्थना केली? *(2)*
- ते सौम्यपणे-विनम्रतेने गेले की मारामारीच्या उद्देशाने गेले? *(3)*
- त्यांनी सोबत कोणकोणती साधने नेली? *(4. त्यांनी कमीतकमी अगदीच जुजबी सामान सोबत घेऊन भौतिक गोष्टींपेक्षा देवावर अवलंबून राहावे अशी येशूची इच्छा होती.)*
- वाटेत जाता जाता त्यांनी थांबून आपल्या मित्रांची भेट घेतली का? *(4)*
- शांतवृत्तीने त्यांचे स्वागत करणायांच्या घरीच राहणे त्यांनी केले का? *(5-8)*
- लोकांना भेटल्यावर त्यांनी कोणत्या दोन गोष्टी केल्या? *(9)*
- ज्या ठिकाणी सुवार्ता नाकारली तिथे काय कण्यास येशूने सांगितले? *(10-11)*
- शिष्यांनी ख्रिस्ताचे आज्ञापालन केल्यावर सैतानाच्या सामर्थ्याचे काय झाले? *(18)*
- भूतांना बांधून ठेवण्यापेक्षा अधिक महत्वाचे काय आहे असे येशूने सांगितले? *(20)*

बहात्तर सुवार्तिक ह्या कथावृत्तांताचे नाट्यीकरण करा. मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढायांशी चर्चा करुन व्यवस्था करा. भोठया मुलांना लहानांकडून तयारी करुन घेण्यास मदत करावीमोठया मुलांनी किंवा प्रौढांनी येशू, शत्रू आणि निवेदक ह्या भूमिका कराव्यात.

- शत्रूची भूमिका प्रौढ व्यक्तीने केल्यास अधिक चांगले होईल.
- **लहान मुलांनी सुवार्तिक** आणि **लोक** हया भूमिका कराव्यात.

**निवेदक :** लूक 10:1-16 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगून मग म्हणा. ''कामकारी पाठवण्याची देवाला विनंती केल्यावर येशूने आपल्या शिष्यांना काय सांगितले ते ऐका.''

**येशू:** ''दोघे दोघे मिळून जा. काळजी घ्या, लांडग्यांमध्ये कोकरे तसे पाठवत आहे. सुवार्ता सांगा. आजायांना बरे करा. मी लवकरच येत आहे अशी घोषणा प्रत्येक गावात करा. देवाचे राज्य जवळ येत असल्याचे सांगा.''

**शिष्य:** ''आम्ही आपल्या बरोबर काय काय घेऊन जावे?''

**येशू:** ''कमीत कमी, अगदी जुजबी सामान घ्या. लवकर आटपा! वाटेत जाताना कोणाला भेटू नका, हा संदेश तातडीने पोचला पाहिले!''

**शिष्य:** ''आम्ही कोठे रहावे?''

**येशू :** ''शांतता प्रिय मनुष्य शोधा. त्या गावात अशाच माणासाच्या घरात राहा. त्याच्याच घरी जेवा.''

**शिष्य :** ''लोकांनी आम्हांला नाकारले तर आम्ही काय करायचे?''

**येशू :** ''तुम्ही लोकांना अगदी स्पष्टपणे संदेश सांगितला आणि तरीही त्यांनी तुम्हांला नाकारले तर दुसया ठिकाणी जा.''

**शिष्य:** जोडी जोडीने जात म्हणा, ''सुवार्ता ऐका! यामुळे आमची जीवने बदलून गेली,'' ''येशूच्या नावात बरे व्हा!''

''आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात देवाकडून मिळणारी पापक्षमा मिळवा.''

**शत्रू:** ''माझे नाव शत्रू! मी सर्व माणसांचा द्वेष करतो!'' शिष्यांच्या मागे जात म्हणा. ''अरे असे दोघा दोघांनी जाऊ नका. मोठया संख्येने एका गटात एकत्र राहिले म्हणजे कसला धोका नसतो!''

''सोबत भरपूर खाण्याचे पदार्थ घेण्यास विसरु नका!''

''बरोबर भरपूर खाण्याचे पदार्थ घेण्यास विसरू नका!''

''वाटेत जाताना आपल्या मित्रमंडळीची अवश्य भेट घ्या!''

''एकाच ठिकाणी राहू नका. जिथे उत्तम जेवण मिळेल असे घर शोधा!''

''लोकांनी तुमचे ऐकले नाही तरी प्रयत्न सोडू नका. त्यांना परत परत सांगत राहा!''

''जोपर्यन्त सर्वांना सुवार्ता समजत नाही तोपर्यन्त एकाच व्यक्तीला दोन वेळा सुवार्ता सांगणे योग्य होणार नाही. म्हणून गावातील प्रत्येक दारासमोर एक एक हस्तपत्रिका ठेवून द्या.'

**शिष्य:** शत्रू वरील गोष्टी एकेक करुन सांगत असताना येशूने नेमक्या या विरुद्ध दिलेल्या सूचना सांगा.

**निवेदक:** लूक 10:17-23 मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''शिष्य सोपवलेले काम संपवून परत आले तेव्हा त्यांनी येशूला काय सांगितले ते ऐका।''

**शिष्य :** ''प्रभू येशू. आम्ही खूप खूप आनंदात आहोत! तुझ्या नावात मोठे सामर्थ्य आहे! तुझा अधिकार वापरुन आम्ही लोकांना बरे केले-आरोग्य दिले! तू तुझे सामर्थ्य आम्हांला दिलेस याबद्दल तुला धन्यवाद देतो! आम्ही अगदी भूताखेतांनाही बांधून टाकले!''

**येशू:** ''तुम्हांला सामर्थ्य मिळाले म्हणून नाही तर तुमची नावे स्वर्गात लिहिली गेली याबद्दल आनंद करा.''

(प्रार्थना करा) ''प्रेमळ पित्या, लहान बालकांप्रमाणेच दुर्बल असणाया ह्या मनुष्यांच्या द्वारे तू कार्य केलेस याबद्दल मी तुझे आभार मानतो. तुझ्या सांगण्याप्रमाणे माझे सामर्थ्य आणि सत्य मी त्यांच्याकडे सोपवून दिले आहे.''

**निवेदक:** मदत करणाया प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न:** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर त्यानी पान क्र. 1 वरील प्रश्न मोठया माणसांना विचारावेत.

मुलांना वाटेने चालत जाणाया दोन माणासांचे साधे चित्र काढण्यास सांगा. हे चित्र मुलांनी पुढच्या उपासनेच्यावेळी मोठया माणसांना दाखवून आपल्याला इतर ठिकाणच्या लोकांकडे येशूची सुवार्ता कशा प्रकारे घेऊन जाता येते ते यावरुन स्पष्ट होते. असे सांगा.

**चर्चा करा** येशूचे आज्ञापालन करण्यास आम्हांला लोकांना कसे शिकवता येईल. मुलांना उदाहरणे देण्यास सांगा.

**कविता:** दोन मुलांना यशया 52:7-8 यातून प्रत्येकी एक वचन म्हणण्यास सांगा.

किंवा, चार मुलांना यशया 52:7-10 यातून प्रत्येकी एक वचन म्हणाण्यास सांगा.

**मोठया मुलांना:** लूक 10:2 मधील येशूचे शब्द किंवा लूक 10 मधील इतर वचने निवडून त्यावर आधारित कविता किंवा गीत लिहिण्यास सांगा.

**पाठ करा.** मार्क 1:15

**प्रार्थना :** ''प्रिय पित्या, इतरांना येशूची सुवार्ता सांगण्यासाठी आमचे साहाय्य कर. लक्ष विचलित करणाया या जगातील गोष्टींपासून आम्हांला दूर ठेव. येशूच्या शिष्यांचा आदर्श समोर ठेवून आम्ही चालावे असे होऊ दे. त्यांच्या प्रमाणेच आमच्याकडूनही आपल्या नावाचे गौरव करुन घे.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net